# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/01/2023 (गुरूवार) सकाळ

### घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील क्वॉर्टर नं. ५७/२०५ न्यु बी टाइप वाघोडा, ता. सावनेर येथे फिर्यादी नामे– अभिषेख जमनाप्रसाद दुबे, वय २५ वर्ष, रा. क्वॉर्टर नं. ५७/२०५ न्यु बी टाइप वाघोडा सावनेर व त्याची आई ही तिच्या मुलीकडे घराला कुलुप लावुन दिनांक १७/०१/२०२३ चे सकाळी रामटेक येथे गेली व दुसऱ्या दिवशी सायं ०६.०० वा. घरी परत आले असता घरातील बेडरूम मध्ये लोखंडी गोदरेज आलमारी मध्ये ठेवलेले १५ वर्ष जुने दोन सोन्याचे गोफ प्रत्येकी १० ग्रॅम वजनाचे एकुण २० ग्रॅम किंमती अंदाजे ३००००/– रू., दोन सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ३ ग्रॅम वजनाचे एकुण ६ ग्रॅम किंमती अंदाजे ९०००/– रू., कानातले सुईधागा पॅटर्नचे दोन जोड झुमके ५ ग्रॅम वजनाचे किंमती अंदाजे ७५००/– रू. असा एकुण ४६,५००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर पो.स्टे. सावनेर मो. क्र. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा सीऐट कंपनी समोर येथे दिनांक १६/१/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक १७/०१/२०२३ चे ०७.०० वा. पर्यत फिर्यादी नामे– रिंकु सुचिन्द्रप्रसाद बैठा, वय ३५ वर्ष, रा. सूर्यमणी नगर उज्वल गौरकशण बहादुरा रोड नागपूर हा आपले कंट्रक्शनचे काम मागील ५ महीन्यापासून आर के चौहान कंपनी एमआयडीसी बुट्टीबोरी येथे करीत आहे. फिर्यादीने कामावर रोशन दिलीप मुळे याला देखरेख करीता ठेवले तो कामावरून दि. १६.०१.२०२३ रोजी आपल्या घरी निघून गेला असता रात्री कोणीतरी अज्ञात चोराने सेट्रींगचे २६ प्लेट प्रत्येकी १०००/–रू. किंमती अंदाजे एकूण २६०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि/४८० श्रीकांत गौरकर मो. नं. ७०२०१३२६६३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर